MAHARASHTRA TIMES; APRIL 11th '2005

अनिल शिंदे



■ 'महावीर महात्मा अवॉर्ड २००५ फॉर वननेस'चे विजेते जिमी मिस्त्री, समीर साळगावकर, कृष्णा मेहता, संजय लीला भन्साळी आणि संजीव अभ्यंकर

कर्तृत्वाशी तादात्म्याला 'वननेस' पुरस्कार!

मुंबई (म. टा. प्रतिनिधी) : 'महावीर महात्मा अवॉर्ड २००५ फॉर वननेस'चे वितरण शनिवारी मध्यरात्री सहारच्या आयटीसी ग्रँड मराठा शेरेटनमध्ये गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मोठ्या दिमाखात पार पडले. टाइम्स फाउंडेशनच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'वननेस फोरम'तर्फे हे पुरस्कार देण्यात आले.

हिंदुस्थानी शास्त्रीय गायक संजीव अभ्यंकर, चित्रपटकार संजय लीला भन्साळी, फॅशन डिझायनर कृष्णा मेहता, वास्तुविशारद जिमी मिस्त्री, आणि सामाजिक कार्यकर्ते समीर साळगावकर यांना, कार्यक्षेत्रातील मेहनत, वेळ वा धार्मिक विचारांच्या योगदानाबद्दल या पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

याप्रसंगी बोलताना संजीव अभ्यंकर म्हणाले की, या पुरस्काराने माझी जबाबदारी आणखीच वाढली आहे. शास्त्रीय संगीताला आणखी उच्च पातळीवर नेईन, तेव्हाच खऱ्या अर्थाने या पुरस्काराचे सार्थक होईल.

शब्दांपेक्षा कृतीच जास्त बोलकी असते, अशी धारणा असलेले भन्साळी हा पुरस्कार स्वीकारतानाही आईला सोबत घेऊन आले होते. त्यांना पुरस्कार प्रदान करताना 'ब्लॅक' सारखा कठीण विषय यशस्वीरित्या हाताळणाऱ्या या माणसाबद्दल काही वेगळे सांगायची गरज आहे का, अशा शब्दांत आयटीसी ग्रँड मराठा शेरेटनचे व्हाईस प्रेसिडेंट सर्बजीत धवन यांनी त्यांचा गौरव केला.

फॅशन जगतात कातड्याचा वापर न करण्याचे जणू व्रत पाळणाऱ्या आणि खादीपासून वैविध्यपूर्ण कपडे बनविणाऱ्या कृष्णा मेहतांचा तसेच आर्किटेक्ट जिमी मिस्त्री यांचा हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

तळागाळातल्या लोकांसाठी आणि आदिवासी भागातल्या मुलींच्या भवितव्यासाठीने कार्य करणाऱ्या साळगावकरांना पुरस्कार देताना एसएनडीटीच्या कुलगुरू रूपा शहांनी त्यांच्या या कार्याबद्दल आदर व्यक्त केला.

साधक शिवानंद सरस्वती या नावाने ओळखले जाणारे अध्यात्मिक राज गुरूकुलमचे संस्थापक उदय राज गडनीस आणि दृष्टी फाऊंडेशन यांनी अनेक चित्रकार, कवी आणि संगीतकारांसह भारतातल्या महान संताना आदरांजली वाहिली. गडणीस यांनी या वेळी ३० बाय ३० कॅनव्हॉसवर अनुराधा पौडवाल, अंजली भागवत, प्रतिभा नाथानी, स्मृति इराणी या चार कर्तृत्ववान महिलांपासून स्फूर्ती घेऊन दशमहाशक्तीनिधी संकल्पनेवरील चित्रकृती सादर केली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय शास्त्रीय सुरावटीने झाली. मनोहर पटवर्धन यांनी सायंकाळी सहा वाजता नारदीय कीर्तनाने कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला. उस्ताद रशीद खान यांनी मीराबाई, दीपा त्यागराजन यांनी संत पुरंदरदास आणि अजय पोहनकर यांनी संत कबीर यांच्या रचना सादर करून सर्व श्रोतृवृंदाला मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाची जादू रविवारी पहाटे पर्यंत पसरली होती. 'ब्रम्हमुहूर्तम' सूक्ताने कार्यक्रमाचा शेवट झाला.

जिल्हा व राज्यस्तरांवर होत असलेल्या या 'महावीर महात्मा अवॉर्ड २००५ फॉर वननेस'चा अंतिम सोहळा २० एप्रिलरोजी महावीर जयंतीदिनी, नवी दिल्ली येथील विज्ञान भवनमध्ये पार पडणार असून त्याचे आयोजन भारतीय जैन संघटनेने केले आहे.